# नियमित दिवाणी दावा क्र.१९७/२०२४ मधील
# निशाण क्र.२६ खालील आदेश

[ CNR No.MHKO090004862024 ]

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.२ यांनी वादग्रस्त मिळकतीबाबत जैसे-थे परिस्थिती ठेवावी याकरिता सादर केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१२ यांनी दावा मिळकतीतील घराचा भाग जबरदस्ती पाडला आहे व दावा मिळकतीचे स्वरूप ते बदलू पाहत आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत दावा मिळकतीसंदर्भात जैसे-थे परिस्थिती ठेवण्याचे आदेश द्यावेत.

३. प्रतिवादी क्र.१२ यांनी असे कथन केले की, ते आजरोजी प्रकरणात हजर झाले आहेत. जवळची तारीख नेमल्यास ते नि.५ वर आपले सविस्तर म्हणणे सादर करतील. सबब नि.५ वरील अर्जच गुणदोषावर निकाली काढणेत यावा.

४. दोन्ही पक्षांचे कथन ऐकण्यात आले. वादी व प्रतिवादी यांची बाजू गुणदोषावर निकाली काढण्यास वेळ जाणार आहे. दरम्यानच्या काळात वादग्रस्त जमिनीचे स्वरूप बदलल्यास गुंतागूंतीची परिस्थिती निर्माण होईल. प्रकरणात दावा मिळकतीचे छायाचित्र सादर करण्यात आले आहे. छायाचित्रामध्ये दर्शविलेली परिस्थिती दोन्ही पक्षांस सद्यस्थितीत मान्य आहे. सबब दोन्ही पक्षांस पुढील

तारखेपर्यंत आजरोजी दाखल केलेल्या छायाचित्रातील परिस्थिती जैसे-थे ठेवण्याचे आदेश दिल्यास न्यायोचित ठरेल.सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :-

## **आदेश**

१] वादी व प्रतिवादी क्र.१२ यांना आदेशित करणेत येते की, त्यांनी दावा मिळकतीसंदर्भात आज दाखल छायाचित्रामधील परिस्थितीप्रमाणे जैसे-थे परिस्थिती पुढील तारखेपर्यंत कायम ठेवावी.

२] दोन्ही पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by NARENDRA
Date: 2024.09.04 17:34:32 +0530

स्थळ : गडहिंग्लज.

दिनांक : ०४.०९.२०२४.

( न. श्री. पुरी )

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

गडहिंग्लज